प्रेरणास्रोत : स्व. श्री रामगोपाल माहेश्वरी
नवराष्ट्र
नवभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र
सदैव आपल्या वाचकांसोबत
पुणे, शनिवार, दि. ११ जुलै २०२६

# वारीनिमित्त उद्या, भरतनाट्यम कार्यक्रम

पुणे, फ्युएल शिक्षण संस्थेतर्फे पंढरपूर वारीची भक्ती, परंपरा आणि अध्यात्म भरतनाट्यमच्या माध्यमातून उलगडणारा 'माऊली – एक कालातीत परंपरा' हा विशेष कार्यक्रम रविवारी दि. १२ जुलै सायंकाळी कोथरूड येथील एमईएस सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम नृत्यांगना, नृत्यदिग्दर्शक आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांची या कार्यक्रमात प्रस्तुती होणार असून, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. फ्युएल शिक्षण संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सीएसआरच्या माध्यमातून मोफत शिक्षण घेणाऱ्या फ्युएलमधील दहा विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी निधी उभारण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले.